# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**

**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१२७८/२०२२/अहिल्यानगर**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. अरुण सोपान वाबळे<br>रा. मु. पो. गुहा, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर-४१३७०५ | कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर, ता.जि. अहिल्यानगर. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर, ता.जि. अहिल्यानगर. |

**सुनावणी दिनांक —२१/०५/२०२५**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | प्रतिनिधी उपस्थित | उपस्थित | प्रतिनिधी उपस्थित | प्रतिनिधी उपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २१/०२/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती अप्राप्त आहे,

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जन माहिती अधिकाऱ्यास २५,०००/- रुपये दंड करण्यात यावा. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जाणीव पुर्वक सुनावणी घेतली नाही, त्यांच्यावर शासन परिपत्रकान्वये प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अपीलदाराचा आजपर्यंतचा रु.१०००/- चा खर्च नुकसान भरपाई स्वरुपात देण्यात यावा.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०४/१०/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०८/१०/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन.०१/०५/२०२१ ते ३०/०९/२०२१ अखेर..

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** कर्मचारी संवर्ग क्र.३ मधील कर्मचाऱ्यांच्या बदली आदेशाच्या सत्य प्रति देण्यात याव्यात. वरिल कालावधीमध्ये आपल्या कार्यालयाच्या स्तरावरुन अधिकारी वर्ग-३ च्या प्रशासकीय, विनंती, बदल्या केलेल्या आहेत. त्या सर्व बदल्यांची आदेशांच्या सत्य प्रती देण्यात यावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर, यांनी दि. १८/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये, अपीलार्थी यांचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा कार्यासन आस्था-३ सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांना अधिनियमाच्या कलम ६(३)(२) मधील तरतुदीनुसार हस्तांतरित केला असल्याचे दिसून येते.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २०/१२/२०२१

(२) प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २८/१२/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती अप्राप्त आहे.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर, यांनी दि.२५/०४/२०२२ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी अपिलकर्त्यास उपलब्ध असलेली माहिती देणे कामी आस्था-३ कार्यासनास कळविले होते. असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. आस्था-३ कार्यासनाकडुन अर्जदार यांना माहिती पुरविलेली नाही. तरी जन माहिती अधिकारी साप्रवि-१, जि.प. अहिल्यानगर, यांनी आस्था-३ कार्यासनामार्फत सदरचा आदेश मिळालेनंतर तात्काळ संबधीत अर्जदार यांना माहिती पुरविणेत यावी. व यापुढे विहित वेळेत माहिती पुरविणे बाबत दक्षता घेणेत यावी. असे नमुद करुन प्रथम अपिल निकाली काढण्यात आले असल्याचे दिसून येते.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

- **जन माहिती अधिकारी –** दि.१८/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अर्ज वर्ग केला असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले की, कोरोना कालावधी होता, त्या मध्ये जन माहिती अधिकारी कोरोना पोझिटिव्ह होते त्यामुळे माहिती देता आली नाही.
- **प्रथम अपीलीय अधिकारी –** यांनी दिनांक १५/०५/२०२२ रोजी खुलासा सादर केलेला आहे, त्यामध्ये असे नमुद आहे की, श्री. अरुण सोपान वाबळे मु.पो. गुहा ता. राहुरी जि. अहिल्यानगर यांचा माहिती अधिकारातील दि.०४/१०/२०२१ चा अर्ज या कार्यालयास दि.०८/१०/२०२१ रोजी प्राप्त झाला आहे. त्यानुसार केमाअ कार्यासनाकडिल पत्र क्र. साप्रवि-१/केमाअ/५८९/२१ दि.१८/१०/२०२१ अन्वये जन माहिती अधिकारी यांचे मार्फत कार्यासन आस्था-३ यांना माहिती उपलब्ध करुन देणे बाबत कळविण्यात आले होते. तसे अपीलार्थी श्री. अरुण वाबळे यांना नोंदणीकृत डाकेने कळविण्यात आले होते. त्यानंतर श्री. अरुण वाबळे यांनी दिनांक २०/१२/२०२१ व्दारे प्रथम अपील अर्ज सादर केला. सदरचा अपील अर्ज या कार्यालयास दिनांक २८/१२/२०२१ रोजी प्राप्त झाला. जिल्हा परिषदेमध्ये कोविड पेशंट निघाल्यामुळे सदर अर्जावर सुनावणी घेता आली नाही, कोविड परिस्थितीत सुधारणा झाल्यावर, सदर अपील अर्जाची प्रथम सुनावणी दिनांक २५/०४/२०२२ रोजी दु.०१.०० वा. ठेवण्यात आली. तसे अपीलार्थी श्री. अरुण वाबळे यांना माहिती अधिकार कार्यालयाकडिल पत्र जा.क्र. केमाअ/२३२/२०२२, ५७४/२०२२ दि.१३/०४/२०२२ अन्वये नोंदणीकृत डाकेने कळविण्यात आले होते. तथापी दिनांक २५/०४/२०२२ रोजी सुनावणी साठी श्री. वाबळे हे अनुपस्थित राहील्याने उपलब्ध नस्तीतील कागदपत्रानुसार गुणवत्तेवर आधारित निर्णय पारित करणेत आला.
- अपिलार्थी श्री. वाबळे यांना, निकालपत्र आदेश क्र. वशि/केमाअ/२८८/२०२२,७०७/२०२२ दिनांक ०९/०५/२०२२ नोंदणीकृत डाकेने श्री. वाबळे यांना पाठविण्यात आले आहे. प्रथम अपिलीय आदेशा नुसार अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती पत्र जा.क्र. साप्रवि१/आस्था-३/६०३/२०२२ दि.२०/०५/२०२२ अन्वये नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आलेली आहे. तरी सदर व्दितीय अपील निकाली काढणेत यावे ही विनंती.

**६. निष्कर्ष –**

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, अहिल्यानगर, यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज दि.१८/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये, कार्यासन आस्था-३, सा.प्र.वि.जि.प. अहिल्यानगर यांना वर्ग केला असल्याचे दिसून येते.

(२) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर, यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने दि. २५/०४/२०२२ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित केले असल्याचे दिसून येते.

(३) अपीलार्थी अनुपस्थित असल्याने कोणती माहिती अप्राप्त आहे याचा कोणताही बोध होऊ शकला नाही.

(४) जन माहिती अधिकारी यांनी कोरोना असल्यामुळे माहिती वेळेवर दिलेली नाही परंतु प्रथम अपिल निर्णयानंतर माहिती दिली असल्याचे दिसून येते.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१२७८/२०२२/ अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** ६६९६

2 9 AUG 2025